# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

## प्रेस नोट

दिनांक :- ०८/०२/२०२४

## नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांविरोधी व्यापक स्वरूपात कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयातील पोलीस ठाणेनिहाय अवैध व्यवसायांविरोधात दिनांक ०७/०२/२०२४ रोजी व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाईत नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीत अवैध गावठी हातभट्टीची दारू बनविणारी ठिकाणे, त्यामध्ये डोंगर, द-या, नदी, नाले अशा अतिदुर्गम ठिकाणांवर पायपीट करून, त्यांचा शोध घेवून छापे टाकण्यात आले आहे. तसेच अवैधरित्या गावठी दारू, देशी विदेशी मद्याची वाहतूक करणारे वाहने, तसेच विक्रीच्या ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली आहे. तसेच अवैधरित्या अंमली पदार्थांची तस्करी व विक्री करणा-या आणि अवैधरित्या मटका व जुगार चालविणारे व खेळणारे इसमांवर कारवाई देखील कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०७/०२/२०२४ रोजी अवैध व्यवसायांविरोधी केलेली कारवाई खालील प्रमाणे

| अ.क्र. | कारवाई | केसेसची संख्या | आरोपी संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुंबई दारूबंदी कायदा | ४९ | ५० |
| २ | महाराष्ट्र जुगार कायदा | २ | २ |
| ३ | एन.डी.पी.एस. कायदा | १ | २ |
|  | एकुण | ५२ | ५४ |

जिल्हयातील सर्व अवैध व्यवसाय हद्दपार करण्यासाठी अशा व्यवसायांची माहिती पोलीसांना कळवावी असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी केले आहे.